देगलूर महाविद्यालय, देगलूर
जि. नांदेड

Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal
(Journal No. 47023)

ISSN 2319 - 8508
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# GALAXY LINK

Volume - X, Issue - I
November - April - 2021-22
English / Marathi Part - I

Impact Factor / Indexing
2019 - 6.571
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

ISSN 2319 - 8508
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# GALAXY LINK

Volume - X Issue - I November - April - 2021-22

English / Marathi Part - I

**Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal
Journal No. 47023**

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

**IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.571
www.sjifactor.com**

❖ EDITOR ❖

**Assit. Prof. Vinay Shankarrao Hatole**
M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R),
M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

**Ajanta Prakashan**
Aurangabad. (M.S.)

VOLUME - X, ISSUE - I - NOVEMBER - APRIL - 2021-22
GALAXY LINK - ISSN 2319 - 8508 - IMPACT FACTOR - 6.571 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | कांशीरामजी आणि बहुजन समाज पक्षाची यशस्वी वाटचाल याचा संशोधनात्मक अभ्यास<br>**श्रीमती. जयश्री सोनकवडे** | १-८ |
| २ | संत शेख महंमद महाराज आणि त्यांची वंशपरंपरा<br>**डॉ. नवनाथ दत्तात्रय वाजगे** | ९-१२ |
| ३ | लोकमान्य टिळकांचा समकालीन मराठी साहित्यावरील प्रभाव<br>**डॉ. संजयकुमार कोळी** | १३-१७ |
| ४ | महाराष्ट्रातील स्वायत्त महाविद्यालयांतील विद्यार्थी, प्राध्यापक, विभागप्रमुख व प्राचार्य यांना होणाऱ्या फायद्यांचा अभ्यास<br>**डॉ. पाठक सुहास सखाराम**<br>**झाकडे अर्चना प्रल्हाद** | १८-२२ |
| ५ | स्वतंत्र भारतातील बंजारा स्त्री<br>**डॉ. लक्ष्मण पवार** | २३-२७ |
| ६ | इंग्लंडची औद्योगिक क्रांती व त्याचा भारतावर पडलेला प्रभाव<br>**स्वप्नील देवराव मलोडे**<br>**प्रा. डॉ. आर. पी. किरमीरे** | २८-३२ |
| ७ | इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांसाठी जलद गतीने शिक्षण<br>**श्री. महेश मधुकर पालकर**<br>**प्रो. डॉ. मेघा म. उपलाणे** | ३३-३८ |
| ८ | कोवीड-१९ चा आंतरराष्ट्रीय धोरणांवर पडलेला प्रभाव<br>**डॉ. एस. आर. पाटील** | ३९-४२ |
| ९ | अन्नभेसळ व कायदे एक अभ्यास<br>**डॉ. गंगासागर तुळशीदास चोले** | ४३-४७ |
| १० | शाश्वत विकासामध्ये मानव विकास निर्देशांकाची भूमिका<br>**डॉ. प्रमोदिनी नवले (कदम)** | ४८-५१ |
| ११ | भारतीय लोकशाही समोरील आव्हाने व उपाय<br>**प्रा. डॉ. संजय मारोतराव देवडे** | ५२-५४ |

VOLUME - X, ISSUE - I - NOVEMBER - APRIL - 2021-22
GALAXY LINK - ISSN 2319 - 8508 - IMPACT FACTOR - 6.571 (www.sjifactor.com)

# ११. भारतीय लोकशाही समोरील आव्हाने व उपाय

प्रा. डॉ. संजय मारोतराव देवडे
लोकप्रशासन विभाग, देगलूर महाविद्यालय, देगलूर.

**प्रस्तावना**

आज आपण भारताचा 75 वा स्वातंत्र्य दिवस स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव म्हणून साजरा करण्याची तयारी करीत आहोत. जगातील सर्वात मोठा लोकशाही देश म्हणून आज भारताकडे पाहिले जाते. स्वातंत्र्यानंतरच्या सात दशकामध्ये भारताने विविध क्षेत्रात दैदिप्यमान कामगिरी केली आहे. विज्ञान तंत्रज्ञानाच्या बाबतीत तर भारताने अमेरिका, इंग्लंड, रशिया या प्रगत देशाच्या रांगेत स्थान मिळवले आहे. अवकाश तंत्रज्ञानामध्ये तर भारताने जागतिक महासत्ता म्हणून ओळखल्या जाणाऱ्या देशांच्याही पुढे पाऊल टाकले आहे. असे असले तरी आज आपल्या देशासमोर अनेक समस्या आव्हाने बनून उभे आहेत. यात वाढती लोकसंख्या, गरिबी, वाढती बेरोजगारी, भ्रष्टाचार या समस्याबरोबरच देशाच्या एकता व अखंडतेला तडा देणारा दहशतवाद, फुटीरतावाद, नक्षलवाद, प्रादेशिकवाद, धर्म, भाषा व जातीआधारीत भेदाभेद आणि त्यातून घडणारे धार्मिक व जातीय दंगली आणि त्याचा देशाच्या सामाजिक ऐक्यावर होणारा परिणाम, घटनात्मक मूल्यांना व घटनात्मक संस्थांना दिले जाणारे तडे, विरोधी मताना चिरडण्याची प्रवृत्ती, जाती–धर्माचे राजकारण इत्यादी काही प्रमुख आव्हानांचा यात समावेश होता. भारतीय लोकशाही समोरील या आव्हानांचे व त्यावरील उपायांचे विवेचन पुढील प्रमाणे करता येईल.

**1. वाढत्या बेरोजगारीची समस्या**

भारत हा 130 कोटीपेक्षा अधिक लोकसंख्येसह जगातील सर्वात जास्त लोकसंख्या असणारा दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे. यातील आर्धी लोकसंख्या ही तरुणांची आहे असे म्हटले जाते. यात तरुण वर्गाच्या श्रमशक्तीच्या जोरावर भारत आर्थिक महासत्ता बनण्याचे स्वप्न बघत आहे. पुरेशा प्रमाणात रोजगार निर्मिती करुन अशा तरुणांना काम किंवा रोजगार देणे शासनाचे मुख्य कर्तव्यांपैकी एक आहे. अधिककाळ तरुणांना बेरोजगार स्थितीत ठेवल्यास या तरुण वर्गाचा वापर देश विघातक कृत्य, सामाजिक अशांतता व कलह, गुन्हेगारी प्रवृत्तीत वाढ, या लोकशाहीस मारक असणाऱ्या गोष्टीसाठी होण्याची शक्यता अधिक असते. त्यामुळे शासनाने तरुण वर्गाला लवकरात लवकर रोजगार किंवा त्यांच्या हाताला काम मिळवून देणे अपेक्षित आहे. परंतु वाढती बेरोजगारीची समस्या ही एक भारतापुढील महत्वाचे आव्हान बनलेले आहे. सतत वाढत जाणाऱ्या बेरोजगारीमुळे भारत एक जगातील सर्वाधिक बेरोजगारीचे जणू एक डबके बनत चालला आहे. भारतात वर्ष 2014 मध्ये 14 कोटी एवढी बेरोजगारांची संख्या होती ती वाढून 2021 मध्ये जवळपास 35 कोटी इतकी झाली आहे.

सेंटर फॉर मॉनिटरींग इंडीयन इकॉनॉमी या संस्थेच्या अहवालानुसार बेरोजगारी दर हा 7.8 टक्के इतका वाढला आहे. बेरोजगारीचा दर जर असाच वाढत राहिला तर त्याच्या सामाजिक शांतता व सुव्यवस्था यावर निश्चित विपरीत परिणाम होईल.

**2. प्रांतवाद किंवा प्रदेशवाद**

आपल्या देशापेक्षा देशातल्या विशिष्ट भागावरच प्रेम करणे, देशाहितापेक्षा विशिष्ट भागाचेच हित पाहणे यालाच प्रादेशिकता, प्रादेशिकवाद किंवा प्रांतवाद असे म्हणतात. विविधेत एकता असे भारताचे वर्णन केले जात असले तरी या प्रांतवादामुळे देशाचे ऐक्य दुभंगते. The Foundation of New India या ग्रंथात के. एम पन्नीकर असे म्हणतात की, प्रादेशिकतेमुळे भारतीय लोकशाही समोर अनेक समस्या निर्माण झाल्या. राष्ट्राला दुर्बल करणारा प्रांतवादही सर्वात मोठी समस्या आहे. प्रांतवाद किंवा प्रदेशवादाला अनेक घटक कारणीभूत असून त्यामध्ये देशातील भौगोलिक, सांस्कृतिक, धार्मिक विविधता, आर्थिक विषमता, प्रादेशिक संघटनांचे पेव फुटणे, प्रादेशिक राजकारणाचे राष्ट्रीय व राज्याच्या राजकारणात वाढते महत्त्व, भाषाभेद इत्यादींचा समावेश होतो. परिणामी नागरिकांमध्ये संकुचित प्रवृत्तीत वाढ होऊन राष्ट्रीय भावनेला खिळ बसते. देशातील लोकशाही बळकट व समर्थ बनवायची असेल तर सर्वप्रथम देशातील नागरिकांमध्ये राष्ट्रीयत्वाची भावना जोपासली व त्यास वृध्दींगत करणे अत्यंत आवश्यक आहे.

**3. जाती–धर्माचा वाढता प्रभाव**

भारतामध्ये जात व धर्म या बाबततीतही खुप भिन्नता आहे. त्यामुळे जात व धर्म यांच्या आधारावर भारतामध्ये अनेक गट निर्माण झाले आहेत. असे गट सर्वप्रथम आपल्या जाती व धर्माचा विचार करतात व नंतर देशाचा विचार करतात. सार्वजनिक जीवनामध्ये जात व धर्माचा प्रभाव कमी व्हावा अशी भारतीय घटनाकरांना भारतीय नागरीकांकडून अपेक्षा होती व त्यासंदर्भात भारतीय राज्यघटनेत तरतूदी करुन तशी व्यवस्था केली परंतु दूर्देवाने भारतात जात धर्माचा प्रभाव कमी होण्यापेक्षा अधिकच वाढताना दिसतो आहे. सत्ता मिळवण्यासाठी जाती व धर्माचे राजकारण करुन या राजकीय पक्षानी समाजात जाती व धर्माचे प्राबल्य वाढवलेच नसून त्यांना खतपाणीसुध्दा घातले आहे त्यामुळे राष्ट्राची एकता खंडीत होऊन राष्ट्रीय ऐक्य धोक्यात येत आहे.

**4. भाषिक भेदाभेद**

भारतातील प्रांतवादाचे मुळ भाषिक भेदाभेद यामध्ये आहे. भारतामध्ये विशिष्ट भाषिक लोक फार मोठया संख्येने विशिष्ट प्रदेशात वास्तव्य करतात. त्यातूनच भाषाविषयक जाती निर्माण झाल्या आहेत. उदा. गुजराती, राजस्थानी, तेलगू, मारवाडी, कोकणी इत्यादी. भारतातील काही शहरे ही बहुभाषिक असली तरी या शहरांमधून भाषिक अभिमान जोपासणाऱ्या संघटना निर्माण झाल्या आहेत. अशा संघटना प्रांतवादाला पोषक असे वातावरण निर्माण करतात. भारतीय संविधानात भाषाविषयक तरतूदी असल्या तरी भारतीय लोक त्यास विशेष महत्त्व देत नाहीत. हिंदीला राष्ट्रभाषा म्हणून मान्यता देणे म्हणजे उत्तर भारतीयांचे वर्चस्व स्वीकारणे असे दक्षिणेकडील राज्यांना वाटते. या भाषेच्या संकुचितपणातून भाषिक संघर्ष निर्माण होतात. भाषाविषयक घटनात्मक तरतूदीमुळे प्रांतवादाला पोषक वातावरण निर्माण झाल्याचे दिसते.

**5. दहशतवाद**

आज भारतासह संपूर्ण जगासमोर उभा राहिलेली सर्वात मोठी व गंभिर समस्या म्हणजे दहशतवाद होय. भारताला अगदी स्वातंत्र्यापासूनच या समस्येला तोंड द्यावे लागत आहे. परंतु वर्तमानात दहशतवादाचे तंत्र व स्वरुप बदलले आहे. भारतात होत असलेल्या दहशतवादी कार्यवाहया या राज्यपुरुस्कृत असून त्यामुळे भारताला फार मोठया वित्त व जीवीतहानीला सामोरे जावे लागत आहे. दहशतवाद हे देशाच्या अंतर्गत व बाहय सुरक्षितेसमोर सर्वात मोठे

आव्हान आहे. पाकिस्तान व चीन यांच्या अप्रत्यक्ष सहकार्याने भारतासमोर दहशतवादी कार्यवाहया करुन भारतातील अंतर्गत शांतता व सुव्यवस्था बिघडविण्यासाठी अनेक दहशतवादी संघटना कार्यरत आहेत.

**6. नक्षलवाद**

नक्षलवादी समस्या भारतासाठी फार नवीन नाही. शासन व जमीनदार वर्गाकडून जनतेवर होत असलेल्या अन्यायाच्या भावनेतून बंगालमध्ये सुरु झालेली ही दहशतवादी चळवळ भारतातील अनेक राज्यात पसरली. छत्तीसगढ, तेलंगना, आंध्र प्रदेश, महाराष्ट्र या राज्यातील जंगली प्रदेशात व आदीवासीबहुल भागात या चळवळी वाढल्या. निरक्षर आणि अज्ञानी लोकांना प्रतिशोधाच्या भावनेतून शासन व सैनिकांच्या विरोधात सशस्त्र संघर्ष करण्यासाठी तयार केली जाते. वर्ष 1980 ते 1990 च्या दशकात ही नक्षलवादी चळवळ फार सक्रिय झाली होती परंतु शासनाच्या धोरण व विकास योजना व जनजागृतीमुळे या चळवळीला आता खिळ बसताना दिसत आहे. नक्षलप्रभावित क्षेत्रातील लोकांना मुलभूत स्वरुपाच्या विविध सेवा सुविधा, रोजगार किंवा नोकऱ्या उपलब्ध करुन दिल्यास नक्कीच ही नक्षलवादाची समस्या संपेल.

**उपाय**

जातीयवादी, धार्मिक विष पसरविणाऱ्या संघटनावर बंदी घालणे. कायद्याची निपक्षपातीपणे अंमलबजावणी करणे. कायदा व सुव्यवस्था राबविणाऱ्या पोलिस व न्यायधिशांची संख्या वाढविणे. त्यांच्यातील गुणवत्ता वाढविणे, न्यायधिशांच्या नेमणूकीत पारदर्शकता आणणे. सीबीआय, इडी, एनआयए, सेबी या सारख्या केंद्रीय एजन्सींना स्वतंत्रपणे काम करु देणे, कुठल्याही प्रकारच्या भ्रष्टाचाराला खपवून न घेणे, विरोधी पक्षाना निर्णय प्रकियेत सामावून घेणे, शिक्षण क्षेत्रात बदल करुन गुणवत्ता वाढीवर लक्ष देणे, वैद्यकीय क्षेत्रात विशेष लक्ष घालून पायाभूत सुविधा बरोबर डॉक्टर व आरोग्य कर्मचारी यांची संख्या वाढविणे, जातीप्रथेचे निर्मुलन, लोकातील धार्मिक व जातीय तेड व द्वेषभाव नष्ट करणे इत्यादी कार्य करता आले तर भारतीय लोकशाही जगात आदर्श लोकशाही म्हणून ओळखली जाईल. प्रा. लास्की यांनी म्हटल्याप्रमाणे जागरुक राहणे हीच स्वातंत्र्याची किंमत आहे. जोपर्यंत भारतीय लोक आपले अधिकार, कर्तव्ये व जबाबदारीबाबत जागरुक राहतील तोपर्यंत भारतीय लोकशाहीला कोणताही धोका नाही.

**संदर्भ**

1. गोस्वामी भालचंद्र, संसदीय लोकतंत्र और उसका विकल्प, पॉईन्टर पब्लिशर्स जयपूर, 1996
2. भारतीय शासन एवं राजनीती, डॉ. बी. एल. फडीया, साहित्यभवन पब्लिकेशन्स आग्रा, प्रथम संस्करण 2003
3. भारत का संविधान और भारतीय राजनितीक व्यवस्था, संपा. कल्पना राजाराम, स्पेक्ट्रम बुक्स प्रायवेट लिमिटेड, प्रथम संस्करण 2008
4. भारतीय शासन व राजकारण, भा. ल. भोळे, पिंपळापुरे पब्लिकेशन्स नागपूर, जून 2019
5. https;//www.orfonline.org.>Marathi



PRINCIPAL
Degloor College,Degloor